## Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

# Agromet Advisory Bulletin

**Date : 23-02-2021**

**Weather Forecast of HINGNA Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-02-23(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-02-24 | 0.0 | 33.4 | 17.3 | 19 | 13 | 6.0 | 360 | 2 |
| 2021-02-25 | 0.0 | 34.8 | 18.6 | 20 | 9 | 6.0 | 349 | 0 |
| 2021-02-26 | 0.0 | 36.0 | 19.6 | 26 | 12 | 5.0 | 360 | 0 |
| 2021-02-27 | 0.0 | 37.0 | 19.4 | 19 | 13 | 12.0 | 333 | 0 |
| 2021-02-28 | 0.0 | 36.7 | 20.2 | 22 | 9 | 7.0 | 17 | 0 |

### Weather Summary/Alert:

In Hingna block, as per forecast given by, RMC, Nagpur,during next five days sky will beclear to partly cloudy and weather will be dry is forecasted.

हिंगणा तालुक्यामध्ये, प्रादेशिक हवामान केंद्र,नागपूर च्या अंदाजानुसार,पुढील पाच दिवस आकाश निरभ्र ते अंशिक ढगाळ तसेच हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### General Advisory:

Mature gram, wheat, linseed, jowar, maize, safflower, arhar and other crops should be harvested and threshed immediately and stored in a safe place. Considering the dry weather and possible rise in temperature, the vegetable and fruit orchardsshould be irrigated as per crop required.

परिपक्व झालेल्या हरभरा, जवस, गहू, ज्वारी, मका, करडई, तूर आणि इतर पिकाची तात्काळ काढणी व मळणीची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कोरडे हवामान आणि तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता भाजीपाला व फळ बागेस पिकाच्या आवश्यकतेनुसार ओलीत करावे.

### SMS Advisory:

Considering the dry weather and possible rise in temperature, the vegetable and fruit orchardsshould be irrigated as per crop required.

कोरडे हवामान आणि तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता भाजीपाला व फळ बागेस पिकाच्या आवश्यकतेनुसार ओलीत करावे.

### Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| CHICK PEA | ChickpeaPodBorerManagement: Due to cloudy weather condition, in case of gram pod borer croses ETL (two larva per meter row length or 5 % pod damage), spraying should be taken of Quinalphos 25 % EC in 20 ml or Emamectin benzoate 5 % SG 3gm or Chlorantraniliprole 18.5 SC 2.5 ml per 10 liters of water. Chickpea Wilt DiseaseManagement:For management of wilt in chickpea, soil application should be done of 2.5 Kg Trichoderma viride 1% WP mixed with 150 kg of FYM or compost/ha.<br>हरभरा घाटे अळी व्यवस्थापन: ढगाळ हवामानामुळे हरभरा पिकामध्ये घाटे अळीने आर्थिक नुकसान पातळी (दोन अळ्या प्रती ओळ किंवा ५ टक्के घाट्याचे नुकसान) गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली किंवाइमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्राम किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५ SC २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हरभरामर रोगव्यवस्थापन:हरभरा पिकातील मर रोगाच्या व्यवस्थापनासाठी ट्रायकोडर्मा व्हीरिडी १ % डब्ल्यूपी २.५ किलो चांगल्या शेणखतासोबत मिसळून प्रती हेक्टर जमिनीच्या क्षेत्रामध्ये टाकावे. |
| CHICK PEA | ChickpeaHarvesting & Threshing:Harvesting and threshing should be maturedchickpea crop and stored in a safe place.<br>हरभरा काढणी व मळणी:परिपक्व झालेल्या हरभरा पिकाची तात्काळ काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| GROUNDNUT | GroundnutWeedManagement:If weed management should be done with herbicide, spraying should be done at 25 to 30 days after sowing after germination with Quizalofop Ethyl 5 % EC 100 gm active ingredient or Imazethapyr10% SL 100 gm active ingredient mixed in 600 liters of water per hectare. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | भुईमुग तण व्यवस्थापन: तणनाशकाच्या सहाय्याने तन व्यवस्थापन करावयाचे असल्यास उगवण पश्चात पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी क्विझालोफॉप इथाईल ५ ईसी १०० ग्राम क्रियाशील घटक किंवा इमाझीथायपर १० % एसएल १०० ग्राम क्रियाशील घटक या पैकी कोणत्याही एका तणनाशकाची प्रती हेक्टर ६०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| WHEAT | Wheat Pink Stem Borer Management:If the incidence of pink stem borer is observed in wheat field, foliar spray of quinalphos 25 EC @ 800 ml /acre as soon as pink stem borer is seen. Irrigation also helps in reducing the pink stem borer damage. WheatAphid Management:In case of infestation of aphids in wheat crop is notice due cloudy weather, spray with Thiamethoxam 25% WG @ 10 to 15 gm or Quinalphos 25 % EC 40 ml per 10 liters of water for management. Wheat Rust & Leaf Blight Disease Management:In case of infestation of rust and leaf blight disease is notice spraying should be done of Mancozeb 75 % WP @ 20 to 25 gm per 10 liters of water. |
| | गहू गुलाबीखोड अळीव्यवस्थापन: गव्हाच्या शेतात गुलाबी रंगाच्या खोड अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी ८०० मिली / एकर या प्रमाणात फवारणी करावी. पिकास ओलीत केल्यास सुद्धा कोड किडीमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होते. गहूमावा किड व्यवस्थापन:सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गहू पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी थायमेथोक्झाम २५ % डब्ल्यूजी १० ते १५ ग्राम किंवा क्विनालफॉस २५ % प्रवाही ईसी ४० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गहू तांबेरा व पानावरील करपा रोग व्यवस्थापन:गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा |
| PIGEON PEA (RED GRAM/ARHAR) | Pigeon PeaHarvesting & Threshing: Carry out harvesting, threshing and safe storage of matured Arhar crop. |
| | तूर काढणी व मळणी:परिपक्व झालेल्या तूर पिकाची काढणीवमळणी ची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| MUSTARD | MustardHarvesting & Threshing: Carry out harvesting, threshing and safe storage of maturedmustard crop. Protect the harvested Arhar crop with tarpaulins. |
| | मोहरी काढणी व मळणी:परिपक्व झालेल्या मोहरी पिकाची काढणीवमळणी ची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कापणी केलेल्या तूर पिक ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावे. |

**Horticulture Specific Advisory:**

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| LINSEED | Linseed Harvesting &Threshing:Harvesting and threshing should be done of mature linseed crop and stored in a safe place. |
| | जवस काढणी व मळणी:परिपक्व झालेल्या जवस पिकाची काढणी व मळणीकरून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| ORANGE | OrangeFruit Dropping Management: Foliar application of gibberellic acid 1.5 gm + urea 1 kg may be given to Ambia bahar during fruit set after mixing it in 100 litres water. (Dissolve gibberellic acid in 10 ml alcohol before mixing in water). |
| | संत्राफळ गळ व्यवस्थापन: आंबिया बहाराच्या फळ गळ व्यवस्थापनासाठी जिब्रेलिक आम्ल १.५ ग्राम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे आंबिया बहार चांगला येण्यास मदत होते. (जिब्रेलिक आम्ल पाण्यात मिसळण्या पूर्वी १० मिली अल्कोहोल मध्ये मिसळावे). |
| ORANGE | Orange Aphid Management:In case of citrus aphid attack, spray quinalphos @ 2 ml or dimethoate @ 2 ml/l and repeat it after every 7 days. OrangePhytophthora DiseasesManagement: For management of Phytophthora diseases, scrap out gum oozing portion by sharp knife, wash with potassium permanganate solution (10 gm in one litre water) from the infected tree trunk and apply Mefenoxam M Z - 68 (Metalaxyl M 4% + Mancozeb 64 % wp) or fosetyl-Al paste. |
| | संत्रा मावा कीड व्यवस्थापन:संत्रा पिकावरील मावा किडीच्या व्यवस्थापनासाठी क्विनालफॉस २ मिली किंवा डायमिथोएट २ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून ७ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. संत्राफायटोप्थोरा रोग व्यवस्थापन: संत्रा झाडाच्या खुंटामधून डिंकाचा स्त्राव दिसून आल्यास असा डिंक तीक्ष्ण चाकूने खरडून टाकावा व ती जागा पोटॅशियम परमॅंग्नेट १० ग्राम १ लिटर पाणी या प्रमाणात केलेल्या द्रावणाने धुवावे व त्या ठिकाणी मेफेनोक्सम एमझेड ६८ (मेटालाक्झेल एम ४ % + मॅन्कोझेब ६४ % डब्ल्यूपी) किंवा फोसेटील- एएल या अमलाची पेस्ट लावावी. |
| ORANGE | Orange Irrigation Management:Continue drip irrigation at the rate of 9-40, 60-96 and 108-137 litres per day for 1-4, 5-7, 8 years andabove trees old respectively. Follow irrigation with double ring method or square method irrigateorchard at 7 to 10 days interval. |
| | संत्रा पाणी व्यवस्थापन: तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला ९ ते ४० लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ६० ते ९६ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १०८ ते १३७ लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. |

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| MANGO | Mango Powdery Mildew Disease Management:Due to continuous cloudy weather,at flowering stage of mango tree In case of symptoms of powdry mildew disease shows on trees spraying should be done of water soluble sulfur 80 % WP 30 gm orTetraconazole 3.8 % EW w/w 12.5 ml or Hexaconazole 5% EC 10 ml mix with per 10 liters of water. |
| | आंबा भुरी रोग व्यवस्थापन:सततच्या ढगाळ हवामानामुळे आंब्याच्या झाडावर फुलोरा अवस्थेत भुरी रोगाची लक्षणे दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी पाण्यात मिसळणारे गंधक ८० % डब्ल्यूपी 30 ग्राम किंवा टेट्राकोनाझोल ३.८ % प्रवाही १२.५ मिली किंवा हेक्झाकोनाझोल ५ % प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| MANGO | MangoJassidManagement: Due to continuous cloudy weather, infestation of Jassids on mango trees and spraying of chemical pesticides is required for management, Buprofezin 25 % SC 10 ml or Deltamethrin 2.8 EC 5 ml or Imidacloprid 17.8 % SL 4 ml or Lambda cyhalothrin 5 % EC 5 ml or Methyl demeton 25 EC 10 ml or Dimethoate 30 EC 16.5 ml per 10 liters of water and spraying should be done on stems, branches, tops and inflorescences of mango. |
| | आंबा तुडतुडे कीड व्यवस्थापन:सततच्या ढगाळ हवामानामुळे आंब्याच्या झाडावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि रासायनिक कीटक नाशकाच्या फवारणीची गरज भासल्यास व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % SC १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % EC ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लॅंबडा सायहॅलोथ्रिन ५ % प्रवाही ५ मिली मिथाइल डिमेटोन २५ % प्रवाही १० मिली किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण खोडावर, फांद्यावर, शेंड्यावर आणि मोहोरावर फवारावे. |
| WATER MELON | WatermelonVariety, Sowing and Fertilizer Management: Sugar Baby, Asahi Yamato, Arka Jyoti, Arka Manik should be selected for watermelon cultivation in summer season. For straight varieties apply 40 kg N, 40 kg P and 40 kg K at the time of planting. Apply 40 kg N 30 days after planting. WatermelonIrrigation Management:Irrigate the Watermelon crop at an interval of 6 to 8 days. According to soil moisture and crop need irrigation interval should be decrease or increase. |
| | टरबूजवाण, पेरणी व खत व्यवस्थापन: उन्हाळी हंगामात टरबूज पिकाची लागवडी साठी शुगर बेबी, असाही यामाटो, अर्का ज्योती, अर्का माणिक या वाणाची निवड करावी. सरळ वाणासाठी लागवडीवेळी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे व ४० किलो नत्र लागवडी नंतर ३० दिवसांनी द्यावे. टरबूज पाणी व्यवस्थापन:लागवड झालेल्या टरबूज पिकास ६ ते ८ दिवसांनी पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर व पिकाची गरज या नुसार दोन पाणी पाळ्यातील अंतर कमी जास्त करावे. |
| MUSKMELON | Muskmelon Variety, Sowing and Fertilizer Management:Hara Madhu, Pusa Sharbati, Punjab Sunhari, Arka Rajhans, Arka Jeet, Pusa Madhuras should be cultivated for muskmelon crop in summer season.Apply 40 kg N, 40 kg P and 40 kg K at the time of planting. Apply 40 kg N 30 days after planting. MuskmelonIrrigation Management:Irrigate the Muskmeloncrop at an interval of 6 to 8 days. According to soil moisture and crop need irrigation interval should be decrease or increase. |
| | खरबूजवाण, पेरणी व खत व्यवस्थापन: उन्हाळी हंगामात खरबूज पिकाच्या लागवडीसाठी हरा मधु, पुसा शरबती, पंजाब सुनहरी, अर्का राजहंस, अर्का जीत, पुसा मधुरस या वाणाची लागवड करावी. लागवडीवेळी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे व ४० किलो नत्र लागवडी नंतर ३० दिवसांनी द्यावे. खरबूजपाणी व्यवस्थापन:लागवड झालेल्या खरबूज पिकास ६ ते ८ दिवसांनी पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर व पिकाची गरज या नुसार दोन पाणी पाळ्यातील अंतर कमी जास्त करावे. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | Considering the availability of irrigation and market demand in summer season, leafy vegetables, okra, guar, chawli, cucumber, Bottle Gourd, pumpkin, ridge gourd, bitter gourd, round gourd, watermelon, muskmelon, spinach, radish, fenugreek and coriander should be cultivated. |
| | उन्हाळी हंगामात ओलिताची उपलब्धता आणि बाजाराची गरज लक्षात घेता पालेभाज्या, भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर यांची लागवड करावी. |
| GENERAL ADVICE | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |